# गुड बाय डॉक्टर

मधुकर तोरडमल



मधुकर तोरडमल यांची नाटके

सैनिक नावाचा माणूस, भोवरा,
काळे बेट लाल बत्ती, आश्चर्य नंबर दहा,
विकत घेतला न्याय, तरुण तुर्क, म्हातारे अर्क,
बाप बिलंदर बेटा कलंदर.

CENTRE FOR FUNDAMENTAL RESEARCH IN INDIA
Date

# गुड्-बाय डॉक्टर

मधुकर तोरडमल

**मॅजेस्टिक बुक स्टॉल**
गिरगाव, मुंबई ४.

# अंक पहिला । प्रवेश पहिला

नव्या मुंबईत कुठे तरी जयंत प्रधान यांची एक छोटी फॅक्टरी उभी राहाते आहे. त्या फॅक्टरीच्या आवारात जयंतनं स्वतः राहाण्यासाठी एक तात्पुरती सोय म्हणून चार खोल्यांची 'हटमेंट' उभी केलेली आहे. मुख्य प्रवेश दरवाजासमोर. डाव्या बाजूला बेडरूमचा दरवाजा. उजव्या बाजूला किचनचा दरवाजा. स्टेजच्या डाव्या भागात ऑफिस-टेबल, रिव्हॉल्विंग चेअर, सोफा, टी पॉय वगैरे. उजव्या भागात छोटे डायनिंग टेबल, तीन-चार खुर्च्या, साइडबोर्ड इत्यादी. सोफ्यावर जयश्री— जयंतची बायको— पुस्तक वाचता वाचता झोपी गेलेली आहे. अर्धवट मिटलेले पुस्तक तिच्या हातात तसेच आहे. वेळ सायंकाळची. पडदा उघडण्यापूर्वी अत्यंत भयप्रद पार्श्वसंगीत सुरू होते. या संगीताचा परिणाम वाढत्या गतीने भयप्रद होत जावा. पडदा वर जातो त्या वेळी स्वप्नाचा आभास निर्माण करणारा निळसर प्रकाशझोत जयश्रीवर आहे. इतरत्र अंधार आहे. जयश्री झोपेत तळमळताना दिसते. तिच्या हातातले पुस्तक गळून पडते. हात छातीवर आणि गळ्यावर जातात. शरीराभोवती आवळला जाणारा कसला तरी अदृश्य विळखा सोडवण्यासाठी ती धडपडते आहे असे तिच्या हातांच्या झटक्यावरून दिसावे. तोंडातून अस्पष्ट कण्हल्याचा आवाज. श्वास घेण्यासाठी धडपडते आहे— गुदमरते आहे. या सर्व अभिनयाचा आणि पार्श्वसंगीताचा परमोत्कर्षबिंदू गाठला जाताच एक भयानक किंकाळी फोडून ती जागी होते. पार्श्वसंगीत खपकन् तुटावे तसे किंकाळीबरोबर थांबते. जयश्रीला दरदरून घाम सुटलेला आहे. धापा टाकते आहे. क्षणभर तिला स्वतःचे भान नसते. किंकाळीपाठोपाठ बेडरूममधून जयंत व रूपाली आणि किचनमधून लिंगप्पा धावत बाहेर येऊन तिच्याभोवती जमतात.

जयंत : काय झालं ? काय झालं जयश्री ?

रूपाली : ममी– ममी काय झालं ?

लिंगप्पा : व्यंकटरमणा– अय्योय्यो ! आक्कासारा, काय झाला जी ?

जयश्री घाम टिपते. स्वतःला सावरते.

जयश्री : तुम्ही... तुम्ही केव्हा आलात ?

जयंत : दहा मिनिटांपूर्वी...तुला झोप लागली होती म्हणून उठवलं नाही.

जयश्री : सहज पुस्तक वाचीत पडले... केव्हा डोळा लागला समजलंच नाही.

रूपाली : ममी, काय झालं ? केवढ्यांदा ओरडलीस...!

जयश्री : काही नाही— काही नाही...( निःश्वास सोडते )

जयंत : स्वप्न पडलं असेल काही तरी ... लिंगप्पा, चहा करून आण गरम गरम..

रूपाली : स्वप्न म्हणजे काय पप्पा ? स्वप्न पडल्यावर असं ओरडायचं असतं ?

जयंत : ते नंतर सांगेन केव्हा तरी. आता तुझा लेसनचा वेळ आहे ना ? आधी लेसन मग फालतू गप्पा.

रूपाली : अं– अं– अं– सांगा ना पप्पा...

जयंत : ना ! आधी लेसन्स. अभ्यासाच्या वेळी अभ्यास ... खेळाच्या वेळी खेळ.. चला, चला पळा.

तिच्या खांद्याला धरून बेडरूममध्ये ढकलतो. बेडरूमचे दार बंद करून परत येतो.

जयश्री : (कण्हल्यासारखी) आई ग... केवढं भयानक स्वप्न होतं. अजून अंगावरचा काटा गेला नाही.

जयंत : असं काय पाहिलंस स्वप्नात ?

जयश्री : सुरुवात इतकी सुंदर... नुकताच सूर्य उगवलेला आहे आणि एका अरण्यात मी हिंडते आहे...अरण्य गर्द प्रचंड पण नितांत सुंदर. इतकं सुंदर की म्हैसूरचं वृंदावन गार्डन त्यापुढे लाजाळूच्या झाडासारखं वाटावं. सूर्याची लाल-सर सोनेरी किरणं.. हिरवीगार पानं...अनंत रंगांची अनंत आकारांची फुलं ...तांबडी माती...पाचूसारखी मखमली गवताची कुरणं आणि या सर्वांतून



मंद झिरझिरणारा पहाटेच्या धुक्याचा मलमली पडदा. ओ ! इट वॉज अ राएट ऑफ कलर्स. फँटॅस्टिक, हेव्हनली. आपण जमिनीवर आहोत असं वाटतंच नव्हतं. इंद्रधनुष्यातूनच चालतो आहोत असं वाटत होतं आणि ... आणि एकदम ठेच लागली, असह्य वेदनेनं कळवळून मी खाली पाहिलं ... पायाच्या ठोकरीनं जमिनीत अर्धवट पुरलेलं काही तरी निखळून समोर पडलेलं होतं. पिवळसर रंगाचं काही तरी. मी निरखून पाहिलं... माणसाची कवटी होती ती. लहानसर, लहान मुलाची असावी कदाचित. आणि डोळ्याच्या एका खाचे-तून लांबच लांब पिवळसर किळसवाणी आळी बाहेर पडत होती. पहाता पहाता ती आळी फुगायला लागली, वाढायला लागली. वाढता वाढता एका प्रचंड अजगरात तिचं रूपांतर झालं. जागच्या जागी थिजून मी ते पहात होते आणि ...आणि काय होतंय हे समजायच्या आतच त्या अजगरानं माझ्यावर झडप घातली. माझ्याभोवती विळखा लपेटला. विळखा आवळायला सुरुवात केली. शरीरातली हाडं कडकडा तुटताहेत असं वाटलं. श्वास कोंडला, जीव गुदमरला ...प्राण कासावीस झाले... हातभर जीभ बाहेर आली. बुबुळं तारवटून फुटता-हेत असं वाटलं... हॉरिबिल–हॉरिबिल. त्याचा थंडगार सरपटणारा स्पर्श हिडीस होता...त्या प्राणांतिक वेदना असह्य होत्या... (आठवणीनं शहारून ) आई ग... अजून तो स्पर्श जाणवतोय– ज्या स्वप्नाची सुरुवात इतकी सुंदर त्या स्वप्नाचा शेवट असा हिडीस व्हायलाच हवा होता का ?

जयंत : अग, स्वप्नच ते. स्वप्नाला काय लॉजिक असतं ? आणि मला तर वाटतं स्वप्नच पडायचं तर ते असंच विचित्र आणि भयानक पडावं. नाही तर आम्हाला स्वप्नं पडतात. केळाच्या सालीवरून पाय घसरून पडलो... नाही तर इन्कम् टॅक्स ऑफिसरसमोर खुर्चीवर बसताना मागून पँट फाटली...त्यापेक्षा हे केवढं फँटॅस्टिक. अग, प्रत्यक्ष आयुष्यात कधीही न मिळू शकणारा अनुभव आणि शिवाय जाग आल्यावर त्यातून सहीसलामत सुटल्याचा आनंद... डबल गेन.

जयश्री : ( जणू स्वतःशीच ) पण काही स्वप्नं भावी संकटाची सूचना देणारीही असतात.

जयंत : नॉनसेन्स ! फरगेट इट. इटस् अ मिअर शॅडो विदाऊट एनी सबस्टन्स. फरगेट इट. ( विषयांतर करीत ) अग हो... आज एक छोटासा जोक वाचला

एका पंधरा मजली शॉपिंग सेंटरच्या तळमजल्यावर पाटी लावलेली होती...
"ग्राहकां आपल्या तक्रारी कृपया तक्रारबुकात लिहाव्यात. त्वरित दखल घेतली जा. तक्रारबुक पंधराव्या मजल्यावर आमच्या ऑफिसमधे ठेवलेले आहे." आणि शेजारी दुसरी पाटी... "लिफ्ट बिघडलेला आहे." (स्वतःच हसतो. ति लक्ष नाही.) आवडला नाही ? अच्छा, जाने दो ! तुला एक कोडं घालतो... लिफ्टवरून आठवलं. एका पंधरा मजली इमारतीचा लिफ्ट बिघडलेला नाही चालू. एका माणसाचा फ्लॅट पंधराव्या मजल्यावर होता. पण लिफ्टमधू जाताना मात्र तो नेहमी बाराव्या मजल्यापर्यंत लिफ्ट न्यायचा आणि पुढे जिने चढून वर जायचा. असं का ?

जयश्री : (थोड्या वैतागानं) मला नाही सांगता येणार का ते...

जयंत : अगं सोपं आहे. तो माणूस बुट्टा होता... टेंगू... त्याचा हात फक्त लिफ्टच्या बाराव्या बटणापर्यंतच पोचायचा. (हसतो) आता एक तुफान जोक सांगतो हां -

जयश्री : जय मी तुमची सेक्रेटरी होते तेव्हा तुमचे जोक्स आणि तुमची कोडी ऐकून घेणं हा माझ्या ड्यूटीचा एक भाग समजायची मी. पण आता तुमची बायको झा यावरही ही ड्यूटी करायलाच हवी का मला ?

जयंत : सॉरी - सॉरी— अगं, विषयान्तर करून तुझं मन रिझवण्याचा एक छोटासा प्रयत्न केल . नाही आवडला, फरगेट इट. (लिंगप्पा चहा घेऊन येतो) हा बघ चहा आला. लिंगप्पा ...

लिंगप्पा : एं ?

जयंत : मेमसाबरु चा बेक्कू.

लिंगप्पा : अयोयो देवरु, आमचा कन्नड भासा बोलतो जी !

हसत ला चहा देतो. त्यालाही देतो.

जयंत : आज स्वयंपाक ओट्री काय कोट्री ?

लिंगप्पा : एक तयार ऐतीरी. अन्ना, सारु, पुंडीपल्ले, कोसंबरी...

जयंत : आ ा— म्हणजे काय ?

लिंगप्पा : आमटीभात जी— आंबाडा भाजी— टमाटाकांदा कोसंबरी...

जयंत : अच्छा ! (लिंगप्पा हसत आत जातो. जयंत वळून पहातो. जयश्री शून्यात



हरवल्या सारखी चहाचा कप तसाच) अग, चहा थंड होतोय...गरम गरम घेतलास म्हणजे बरं वाटेल तेवढंच ... (ती मुकाट्यानं कप ओठाला लावते. जयंत आता गंभीर होतो.) जयश्री ... ...

जयश्री : हं !

जयंत : आपण या नव्या मुंबईत राहायला यायलाच नको होतं. अजून इथे वस्ती नाही... कुठल्याही सोयी नाहीत.

जयश्री : मी तक्रार केलीय का कधी ?

जयंत : नाही. तू तक्रार नाही केलीस, पण मला जाणीव आहे...

जयश्री : कशाची ?

जयंत : तुला होणाऱ्या त्रासाची.

जयश्री : मला काहीही त्रास नाहीये. तुटपुंज्या भांडवलावर फॅक्टरी उभी करायची ती चेंबूरच्या फ्लॅटमधे आरामात झोपून उभी राहात नाही. ज्यांच्याजवळ कोट्यवधी रुपये आहेत त्यांचं ठीक आहे. आपल्यासारख्यांना ती ऐट परवडणारी नाहीये. मालक प्रत्यक्ष साईटवर आला तरच प्रत्येक वीट, प्रत्येक खिळा, प्रत्येक सीमेंटची गोणी मोजली जाते. ही काटकसर आपण तिथे राहून झाली नसती.

जयंत : दॅटस् माय गर्ल. सेक्रेटरीशीच लग्न करण्यात बॉसचा नेहमी फायदा असतो तो असा ... शी नोज एव्हरीथिंग. शी अंडरस्टॅंडस एव्हरी थिंग...

जयश्री : (मंद हसत) थॅंक् यू बॉस. (हाक मारीत) लिंगप्पा—

जयंत : जयश्री, तू मला बॉस म्हणालीस याचा अर्थ काय माहिती आहे ? मघाचं तुझं ते स्वप्नबिप्न पार डोक्यातून निघून गेलंय तुझ्या. दॅटस् द स्पिरिट, कीप इट अप, कीप इट अप.

जयश्री हसत कप उचलून किचनकडे जाऊ लागते. लिंगप्पा येऊन कप घेतो व जातो.

जयश्री : जय... ...

जयंत : (सिगरेट पेटवताना थांबून) हं ?

जयश्री : एक आनंदाची बातमी सांगितली तर काय द्याल ?

जयंत : आनंदाची बातमी ? बा बा ! या वेळी आनंदाची बातमी हवीच आहे.

बोल— ाय हवंय तुला ? पगार वाढवू ? बढती देऊ ?

जयश्री : ढती मीच तुम्हाला देणार आहे. मुलीचे बाप होतात. या वेळी नक्की मुलाचे ाप होणार आहात.

जयंत : म य माय माय म्हणजे— (अत्यानंदाने तिचे खांदे धरून) म्हणजे ? (ती ल जते, तो तिला कुशीत घेतो) ओ माय डार्लिंग – माय डार्लिंग (एकद ) थांब – आता आलो...

घाई त दरवाजाकडे जातो

जयश्री : ाहो, कुठे निघालात ?

जयंत : म गूस पाठवून पेढे मागवून घेतो. मुलगा होवो नाही तर मुलगी. नऊ महिन्यां तर काय वाटेल ते होवो ! आज आपण पेढे वाटणार – पेढे खाणार. वाटल्या पेढे आणि बर्फी दोन्ही मागवतो. ट्राऽलाऽला ... टारऽडी... टारऽडी ... ...

गात बाहेर जातो. ती हसत वळते. हसता हसता एकदम गंभीर होते चेहऱ्यावर कसल्या तरी अनामिक भीतीचा पगडा दिसायला लाग ो. अचानक तान्हं मूल टाहो फोडून रडत असल्याचा आवाज तिल ऐकू येऊ लागतो. भयप्रद पार्श्वसंगीत. ती दचकते, कावरीबावरी होते बावरी होत डोकं घट्ट दाबून धरीत कोचावर कोसळते. प्रकाश मंद ोत काळोख पसरतो.

## अंक पहिला । प्रवेश दुसरा

जयंतचे मुनीमजी काही हिशेब करीत बसलेले आहेत. मधूनच एकदा आकाशाकडे डोळे करून, 'साईनाथा, सोडव रे बाबा' असं म्हणतात. किचनमधून जयंत हातात बिस्किटांचा पुडा घेऊन येतो. बिस्किटं खात खात मुनीमजींशी बोलू लागतो.

जयंत : काय मुनीमजी लागला का हिशेब ?

मुनीमजी : तपासतो आहे. घोळ कुठे तरी सापडणारच. साईनाथांची कृपा आहे.

जयंत : साईनाथ तिकडे शिर्डीला. इथे रोजचा हिशेब. मला एका नव्या पैशाचा घोळ चालणार नाही ! माइंड वेल !

बिस्किट तोंडात कोंबून पुड्याचा चोळामोळा करून टेबलावर टाकतो आणि किचनमधे जातो. मुनीमजी तो पुड्याचा बोळा उचलून हातात घेतात आणि आकाशाकडे डोळे लावतात.

मुनीमजी : शिर्डीकर, बघताय ना. सकाळपासून चहाच्या कपाशिवाय पोटात काही नाही. हे बिस्किटं खाताहेत. आमच्या हातात रिकामा कागदाचा बोळा.

जयंत हातात गाजर घेऊन येतो. मुनीमजींच्या हातातला कागदाचा बोळा काढून घेऊन खिडकीबाहेर फेकतो.

जयंत : डोंट वेस्ट टाईम. (गाजर खात खात बोलतो. मुनीमजी त्याच्या खाण्याकडे टक लावून पहात राहातात.) पै-पैचा हिशेब लागला पाहिजे. पै-पै जपावी तव्हा रुपया जमा होतो आणि रुपया रुपया जपावा तेव्हा अशी फॅक्टरी उभी करता येते. मी आंघोळ करून येतो. तोपर्यंत हिशेब तयार ठेवा.

गाजराचं खालचं बूड टेबलावर टाकून जातो. मुनीमजी गाजराचं बूड हातात घेतात. पुन्हा डोळे आकाशाकडे.

मुनीमजी : हे असं आहे. तुम्ही नुसते पाहात रहा. ( डोकं वहीत खुपसतो, पुन्हा व पाहात ) मिस्टर शिर्डीकर... इथे बावन्न रुपये सत्तर पैशांचा घोळ आहे. सापडत नाही. कसा सापडणार ? तुम्हाला माहीतच आहे आमचा पगार किती आहे. वट्ट एकशे नव्वद रुपये. घरात बायको आहे. आपली माया — दोन मुलं आहेत. हीही आपलीच लीला, त्यांच्या तोंडात आम्ही घालणार काय ? म्हणून हा घोळ आता सोडवा तुम्हीच. ( वहीत डोकं खुपसतो )

जयंत सफरचंद खात प्रवेश करतो, खांद्यावर टॉवेल.

जयंत : ( सफरचंद खात बोलतो. मुनीमजी त्याच्याकडे पुन्हा टक लावतात. ) सकाळी सिमेंटच्या किती गोण्या काढून दिल्यात ?

मुनीमजी : हा.

जयंत : उद्या मी दिल्लीला जाणार आहे. लायसन्सचं काम आहे. परवा परत येईन. त्याचं पेमेंट करू नका. मी आल्यानंतर पाहीन आणि कॉन्ट्रॅक्टर आले की त्यांना मला भेटायला सांगा... आज वडार किती लागलेत ?

मुनीमजी : तीस.

जयंत : ऑफिस बिल्डिंगच्या स्लॅबवर पाणी चालू आहे ना नीट ?

मुनीमजी : हो. दहा पखालवाले लावलेले आहेत.

जयंत : हं .

सफरचंदाचा उरलेला भाग टेबलावर टाकून स्वयंपाकघरात जातो. मुनीमजी त्या उरलेल्या भागाकडे पाहून डोळे वर करतात. जयंत हातात केळं घेऊन प्रवेश करतो.

जयंत : ( केळे खात ) त्या फर्निचरवाल्याला फोन केला होता ?

मुनीमजी : हो !

जयंत : ती वी स्पेसिफिकेशन्स तुम्ही स्वतः जाऊन त्याच्या ऑफीसमधे पोचती करा. सनमायकाचा आणि फोम लेदरचा रंग मी दिल्लीहून आल्यावर स्वतः सिलेक्ट करीन म्हणावं.

केळाचं सालपट टेबलावर टाकतो. ढेकर देतो आणि बाथरूममधे जातो. मुनीमजी केळाचं साल हातात घेतात आणि ढेकर देतात.



मुनीमजी : मिस्टर शिर्डीकर... आश्चर्य वाटायला नको... भरल्या पोटातूनच ढेकर येतात असं नाही. रिकाम्या पोटातूनसुद्धा येतात. गॅस— नुसता गॅस. समजलं ना ?

रागानं केळाचं साल टेबलावर आपटतो. इतक्यात आतून जयंताचा आरडा-ओरडा ऐकू येतो. “ पाण्याचा एक थेंब नाही ” लिंगप्पा— ए लिंगप्पा ” किचनमधून लिंगप्पा येतो, जयंत प्रवेश करतो.

जयंत : लिंगप्पा, गधड्या, बाथरूममधे पाण्याचा एक थेंब नाही.

लिंगप्पा : अय्यय्यो– हिंग ह्यांग आगतद ?

जयंत : ( ओरडून ) ए ऽ ऽ तुझं हे हिंगह्यांग मला काही समजत नाही. मराठीत बोल.

लिंगप्पा : असा कसा होईन जी. आमी टीप भरून ठिवला जी.

जयंत : तुझं डोकं लेका...पाण्याचा एक थेंब नाही. इथे फक्त रात्रीचं पाणी सुटतं. रात्री टीप भरून ठेवायला बजावलं होतं ना तुला ?

लिंगप्पा : भरून ठिवला जी. रातच्यालाच भरून ठिवला.

जयंत : भरून ठिवला ? कसा ?

लिंगप्पा : तुमी सांगितला तसा जी. टीपवरचा जाकन काल्डी. पान्याचा लबरी नळी आत सोल्डी. जाकन परत टीपावर ठिवली. आककासारा काम सांगतली तो केली. परत बाथरूमात जाऊन पाहिला. टीप बरून पानी बाहीर सांडत होता तव्हाच नळा काढून टाकली. नळ बंद केली. सवताच्या हातानं जी.

जयंत : बैल आहेस गाढवा ! मुनीमजी, हा सांगकाम्या नंबर दोन.

मुनीमजी : नंबर दोन नाही साहेब... नंबर एक.

जयंत : नंबर एक तुम्ही.

मुनीमजी : ( आकाशाकडे डोळे ) ऐकताय ना ?

जयंत : गेले चार दिवस यानं पाण्याचं टीप धुतलं नव्हतं.

लिंगप्पा : टीप धू म्हनून सांगला नाही जी तुम्ही. आमी कसा धुनार ?

जयंत : काल मी स्वतः टीप धुतलं. पालथं घातलं. त्यावर झाकण ठेवलं आणि माझ्या कामाला लागलो. हा सांगकाम्या गेला पाण्याची नळी झाकणाच्या